सं. फौजदारी खटला क्र.१९१/२०२३
अंकुश वि रमेश

<u>सत्यपडताळणी</u>

मी , अंकुश सुधाकर बखळे, वय-३५ वर्षे, धंदा - शेती, राहणार खामगांव , ता. जिल्हा - औरंगाबाद, सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की, मी रमेश माणीकराव बखळे व देवीदास बखळे शेजारी राहतो. ते नाल्याच्या पलीकडून राहतात. दि.९/४/२०२३ रोजी रमेश व देवीदास हे नाल्याजवळचा रस्ता करण्याकरीता आले होते. त्यावेळी मी, माझी पत्नी शारदा, भाऊ विलास त्यांना समजावण्यास गेलो असता त्यांनी आम्हाला शिवीगाळ केली व चापटबुक्यांनी मारहाण केली. आम्ही आरडाओरड केली असता माझा भाऊ रोहिदास सुधाकर बखळे तिथे आला असता रमेश व देवीदासने त्याला देखील चापटबुक्यांनी मारहाण केली. त्यांनी आमच्या नादाला लागल्यास तुम्हाला मारुन टाकू अशी धमकी दिली. दुस-यादिवशी आम्ही पोलिस स्टेशनला तक्रार दिली. पोलिसांनी अदखलपात्र गुन्हयाची नोंद केली होती. परंतु त्यांनी कोणतीही कारवाई केली नाही. त्यामुळे मी न्यायालयातील फिर्याद दाखल केली आहे. आरोपीची सखोल चौकशी होउन त्यांना कठोर शिक्षा व्हावी अशी माझी विनंती आहे.

अंकुश सुधाकर बखळे,
सही

समक्ष

27/12/2023

दिनांक २७.१२.२०२३

( धनंजय एस. देवरे )
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्र.२ फुलंब्री